६६७०

# MAHARASHTRA ACT No. LIX OF 1974

## THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SUGAR FACTORIES UNDER ERECTION (POSTPONEMENT OF ELECTIONS) ACT, 1974

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १५ डिसेंबर १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. LIX OF 1974

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO COMMITTEES OF CERTAIN CO-OPERATIVE SUGAR FACTORIES UNDER ERECTION FOR FACILITATING EARLY COMPLETION AT THEIR ERECTION PROGRAMMES OR STARTING OF TRIAL CRUSHING SEASONS.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १२ डिसेंबर १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९.

उभारणी होत असलेल्या विवक्षित सहकारी साखर कारखान्यांना त्यांचे उभारणी कार्यक्रम लवकर पूर्ण करणे किंवा चाचणी दाखल गळिताचा हंगाम सुरू करणे सुलभ होण्याकरिता अशा कारखान्यांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** सहकारी साखर कारखाने हे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३-ग अन्वये विनिर्दिष्ट संस्था म्हणून घोषित करण्यात आले आहेत आणि त्यांच्या निवडणुका, उक्त अधिनियमाच्या प्रकरण अकरा-अ द्वारे किंवा तदन्वये घालून दिलेल्या रीतीने, जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली घेणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांपैकीकाहींच्या, समित्यांच्या सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी संपला होता किंवा लवकरच संपणार होता व निवडणुका घेण्यामुळे व्यवस्थापनाचे आणि या संस्थांच्या सदस्यांचे लक्ष निष्कारण विचलित होऊन त्यांच्या उभारणी कार्यक्रमात अडथळा आला असता व तो विस्कळीत झाला असता किंवा चाचणीदाखल गळिताचे हंगाम सुरू करण्याच्या तारखा लांबणीवर टाकाव्या लागल्या असत्या;

आणि ज्याअर्थी, या संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोट-निवडणुका, त्यांचे उभारणी कार्यक्रम पूर्ण करणे किंवा चाचणीदाखल गळिताचे हंगाम शक्यतो लवकर सुरू करणे शक्य व्हावे म्हणून, विवक्षित कालावधीसाठी लांबणीवर टाकणे इष्ट होते;

आणि ज्याअर्थी, निवडणुका अशा रीतीने लांबणीवर टाकण्याच्या परिणामी, या संस्थांच्या समित्यांचे सदस्य किंवा प्रशासक यांचा पदावधी वाढवणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्तप्रमाणे निवडणुका लांबणीवर टाकणे आणि पदावधी वाढवणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक ठरले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल, महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाली होती आणि, म्हणून त्यांनी महाराष्ट्राचा, उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत (निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७४ हा ४ नोव्हेंबर १९७४ रोजी प्रख्यापित केला ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधान मंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्राचा, उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत (निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल.

(२) तो, ४ नोव्हेंबर १९७४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, ३० नोव्हेंबर १९७५ पर्यंत, तो दिवस धरून, किंवा राज्य शासन, शासकीय राजपत्रात अधिसूचित करील त्या, आधीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील आणि त्यानंतर समाप्त होईल. या अधिनियमाच्या समाप्तीनंतर, तो जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित केल्याप्रमाणे, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ लागू होईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रशासक", "समिती" आणि "संस्था" यांचे अर्थ, त्यांना सहकारी संस्था अधिनियमात नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे असतील ;

(ब) "उभारणी होत असलेला सहकारी साखर कारखाना" म्हणजे, सहकारी संस्था अधिनियमान्वये सहकारी संस्था म्हणून नोंदलेला किंवा नोंदल्याचे समजण्यात येणारा, या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीत उल्लेख केलेला साखर कारखाना ;

(क) "सहकारी संस्था अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

३. सहकारी संस्था अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम व उपविधी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, उभारणी होत असलेल्या कोणत्याही सहकारी साखर कारखान्याच्या समितीची कोणतीही निवडणुक किंवा अशा समितीमधील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी निवडणुक, एखाद्या बाबतीत निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आलेला असला तरी, घेतली जाणार नाही ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असणारे, उभारणी होत असलेल्या प्रत्येक सहकारी साखर कारखान्याच्या समितीचे सदस्य किंवा त्याचे प्रशासक यांचा पदावधी (हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत कोणत्याही वेळी उक्त तारखेपूर्वी किंवा उक्त तारखेनंतर, संपलेला असो) वाढवण्यात आल्याचे किंवा यथास्थिति वाढवण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल आणि असे सदस्य किंवा यथास्थिति प्रशासक, हा अधिनियम अंमलात राहील त्या कालावधीत, पद धारण करतील.

**स्वीकृत करून घेण्याची शक्ती.**

४. उभारणी होत असलेल्या प्रत्येक सहकारी साखर कारखान्याच्या समितीस, तिच्या सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे, त्यांच्या मृत्यूमुळे किंवा अन्यथा निर्माण झालेले कोणतेही रिक्त पद भरण्यासाठी, जो याबाबतीत यथोचित अर्हता प्राप्त असेल अशा कोणत्याही सदस्यास स्वीकृत करून घेण्याची शक्ती असेल.

**समितीस किंवा तिच्या सदस्यास काढून टाकण्याची शक्ती.**

५. लोकहितास्तव तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, त्यास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, उभारणी होत असलेल्या कोणत्याही सहकारी साखर कारखान्याच्या समितीस किंवा तिच्या एका किंवा अधिक सदस्यांस, काढून टाकता येईल आणि अशा रीतीने काढून टाकलेल्या समितीच्या किंवा एका किंवा अधिक सदस्यांच्या जागी, नवीन समितीची किंवा यथास्थिति एका किंवा अधिक प्रशासकांची नियुक्ती करता येईल. या व्यक्तींची नियुक्ती, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीकरिता आणि अशा अटींना व शर्तींना अधीन ठेवून करण्यात येईल :

परंतु, संबंधित सदस्याला किंवा सदस्यांना त्यांच्याविरुद्धच्या प्रस्तावित कार्यवाहीवर अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही.

**कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढवण्यात आला आहे अशा समित्यांच्या आणि सदस्यांच्या व प्रशासकांच्या कृती विधिग्राह्य करणे.**

६. कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढवण्यात आल्याचे समजण्यात आले आहे किंवा यथास्थिति वाढवण्यात आला आहे असे उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या समित्यांचे सर्व सदस्य व प्रशासक, हे वाढीव कालावधीत देखील असे सदस्य किंवा यथास्थिति प्रशासक म्हणून सर्व शक्तींचा वापर करण्यास व सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असतील ; आणि उक्त कालावधीत अशा कोणत्याही समितीने किंवा सदस्याने किंवा प्रशासकाने केलेली कोणतीही कृती, केवळ पदावधी योग्य वेळी वाढवण्यात आला नव्हता किंवा अन्यथा रीतसर वाढवण्यात आला नव्हता किंवा वाढवलेल्या कालावधीत, समिती किंवा सदस्य किंवा प्रशासक, समितीच्या किंवा सदस्याच्या किंवा यथास्थिति प्रशासकाच्या सर्व शक्तींचा वापर करू शकत नव्हता/नव्हती किंवा सर्व कर्तव्ये व कामे पार पाडू शकत नव्हता/नव्हती याच कारणावरून, विधिअग्राह्य समजली जाणार नाही किंवा तद्विरुद्ध कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेतला जाणार नाही.

**विद्यमान समित्या व प्रशासक यांचा वाढवलेला पदावधी संपण्यापूर्वी, नवीन समित्यांची रचना करण्यासाठी व्यवस्था करणे.**

७. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने शासकीय राजपत्रात अधिसूचित करावयाच्या (ह्या अधिनियमाच्या समाप्तीच्या तारखेपूर्वीची तारीख असणाऱ्या) तारखेनंतर, हा अधिनियम अंमलात असेल अशा कालावधीपुरता वाढवण्यात आला आहे असा, विद्यमान समित्यांचा व प्रशासकांचा पदावधी संपण्यापूर्वी, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून सहकारी संस्था अधिनियम आणि तदन्वये केलेले नियम व उपविधी यांच्या उपबंधांनुसार नवीन समित्यांची रचना करण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल.

**सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम चोवीस लागू असणे.**

८. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केलेले असेल ते खेरीज करून, सहकारी संस्था अधिनियम हा इतर सर्व बाबतीत संबंधित सहकारी साखर कारखान्यांना लागू होईल.

**अडचणी दूर करणे.**

९. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना, किंवा त्यात असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात, सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्थांसंबंधीचा इतर कोणताही विधी यांचे उपबंध अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश वीस याचे निरसन व व्यावृत्ती.

१०. (१) महाराष्ट्राच्या, उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत (निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, ह्या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

[कलम २ चा खंड (ब) पहा]

१. श्री. जगदंबा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम-पोस्ट राशिन, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२. आंबेजोगाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड, आंबेजोगाई, जिल्हा बीड.

३. सह्याद्री सहकारी साखर कारखाना लिमिटेड, शिरवडे, ता. कराड, जिल्हा सातारा.

४. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सिल्लोद, जिल्हा औरंगाबाद.

५. कन्नड सहकारी साखर कारखाना लिमिटेड, कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

६. विनायक सहकारी साखर कारखाना लिमिटेड, परसोडा, ता. वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

७. मराठवाडा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, डोंगरकोडा, ता. कळमनुरी, जिल्हा औरंगाबाद.

८. बेलगंगा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, भोरस, ता. चाळिसगांव, जिल्हा जळगाव.

९. दौलत सहकारी साखर कारखाना लिमिटेड, यशवंतनगर, ता. चंदगड, जिल्हा कोल्हापूर.

(यथार्थ अनुवाद)

बा. म. कुलकर्णी,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.